आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२० जून २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री किसान सम्मान निधीचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा, राज्यातल्या सुमारे ९१ लाख शेतकऱ्यांना लाभ

- कोल्हापुरातल्या अंबाबाई मंदिर विकास आराखड्यातल्या विविध कामांचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते भूमीपूजन

- रत्नागिरीजवळ गणपतीपुळ्यातल्या समुद्रात ५ तरुण बुडाले, परभणीत मंदिर उभारणीच्या कामात झालेल्या दुर्घटनेत पाच जणांचा मृत्यू

- वैद्यकीय पदवी प्रवेशासाठीच्या नीट युजी परीक्षेसाठी यंत्रणा सज्ज

आणि

- आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त उद्या विविध कार्यक्रमांचं आयोजन

**<><><><><>**

प्रधानमंत्री  किसान सन्मान निधीचा २३ वा हप्ता आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पश्चिम बंगालमधल्या हुगळी जिल्ह्यात तारकेश्वर इथून वितरित करण्यात आला. प्रधानमंत्री तारकेश्वर इथं पश्चिमबंगा दिवस सोहळ्यात सहभागी झाले होते, यावेळी त्यांनी ९ कोटी ४४ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात एकूण १८ हजार ८८० कोटी रुपयांची रक्कम हस्तांतरित केली. यावेळी प्रधानमंत्र्यांनी रेल्वे, शेती, ग्रामीण विकास, मत्स्यव्यवसाय आणि पशुसंवर्धन संबंधी अनेक विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली.

ही केवळ आर्थिक मदत नाही तर शेतकऱ्यांच्या मेहनत, समर्पण आणि योगदानाचा गौरव आहे, असं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी म्हटलं आहे. पीएम किसान सन्मान निधी अंतर्गत राज्यातल्या ९० लाख ८५ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे १ हजार ८१७ कोटी रुपये रक्कम जमा केल्याचं कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं. यामुळं खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना मोठा दिलासा  मिळाला आहे, असं भरणे बातमीदारांशी बोलताना म्हणाले.

**<><><><><>**

कोल्हापुरातल्या अंबाबाई मंदिर विकास आराखड्याच्या पंधराशे कोटी रुपयांच्या विविध कामांचं भूमिपूजन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते आज झालं. ७ व्या शतकातील या प्राचीन मंदिराच्या परिसरातल्या सुमारे ४१ छोट्या-मोठ्या मंदिराचे संरक्षण करून हा येत्या ६ महिन्यांच्या आत विकसित केला जाणार आहे, असं शहा यावेळी म्हणाले.

**(होल्ड बाईट …गृहमंत्री अमित शहा)**

हा विकास आराखडा भाविकांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देतानाच कोल्हापूरच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटन क्षेत्राच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी व्यक्त केला.

**(होल्ड बाईट … मुख्यमंत्री फडणवीस )**

तीन टप्प्यांत राबवण्यात येणाऱ्या या मंदिराच्या विकास आराखड्याअंतर्गत दर्शन मंडप, अन्नछत्र, मंदिर आणि देवस्थान समिती कार्यालय, स्वतंत्र शौचालय ब्लॉक्स, चप्पल स्टँड, दुकाने, अँफिथिएटर, माहिती केंद्र, सुरक्षा चौकी, मल्टिपर्पज हॉल, पोलीस स्टेशन, प्रथमोपचार केंद्र, वेदपाठशाळा, भोजनगृह आणि मोठ्या क्षमतेचा वाहनतळ उभारण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

नीट यूजी २०२६ फेरपरीक्षा उद्या होणार असून याची पूर्वतयारी म्हणून आज एनटीए नं देशभरात मॉक ड्रील आयोजित केलं होतं. परीक्षा पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीत व्हावी यासाठीच्या तयारीचा हा भाग होता. नीट यूजी फेरपरीक्षेच्या तयारीविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**------------व्हीसी---------------**

*(उद्या होणाऱ्या नीट यूजी फेरपरीक्षेसाठीची तयारी पूर्ण झाल्याचं एनटीए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं म्हटलं आहे. देशातल्या ५५१ आणि परदेशातल्या १४ शहरांमधे ही परीक्षा होणार आहे. २२ लाख ७९ हजार पेक्षा जास्त विद्यार्थी ही परीक्षा देणार असल्याचं एनटीएनं सांगितलं. परीक्षा पारदर्शक आणि सुरक्षित वातावरणात व्हावी यासाठी पोलीस, प्रशासकीय कर्मचारी, निरीक्षक आदी दोन लाख कर्मचारी देशभरातल्या परीक्षा केंद्रावर तैनात करण्यात आले आहेत. तसंच प्रत्येक केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत, विद्यार्थ्यांची ओळख पटवण्यासाठी आधार कार्ड आधारित बायोमेट्रिक बसवले आहेत, प्रश्नपत्रिका तसंच परीक्षेच्या*

*इतर साहित्याची ने आण करण्यासाठी जीपीएस बसवलेल्या पोलिसांच्या वाहनांची सोय करण्यात आल्याचंही एनटीएने सांगितलं. परीक्षा केंद्र असलेल्या जिल्ह्यांमधे कठोर उपाययोजना करण्यात आल्या आहेत. परीक्षेवर देखरेख करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात दंडाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली आहे. तसंच परीक्षा केंद्राच्या दोनशे मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ नुसार कठोर प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत. अनेक जिल्ह्यांमधे विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी प्रशासनातर्फे वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे.*

*नीट यूजी फेरपरीक्षा उद्या दुपारी २ ते सव्वा पाच दरम्यान होईल. यासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर सकाळी अकरा ते साडे अकराच्या सुमारास हजर व्हावं, असं एनटीएने सांगितलं आहे.)*

**<><><><>**

उद्या होणाऱ्या नीट-यूजी फेरपरीक्षेसाठी नागपूर इथल्या एका विद्यार्थ्याला अबुधाबी इथे परीक्षा केंद्र देण्यात आल्याची बातमी प्रसारमाध्यमांमधे प्रकाशित झाली होती. याची एनटीएने तातडीने दखल घेत हा प्रश्न सोडवला, या विद्यार्थ्याला नागपूर इथंच परीक्षा केंद्र दिल्याचं एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह यांनी सांगितलं.

**<><><><>**

गणपतीपुळ्याजवळ समुद्रात आज ५ जण बुडाले त्यातल्या एकाचा मृतदेह हाती लागला आहे. तटरक्षक दल, मच्छीमार बोटी आणि पोलीसांचं पथक इतरांना शोधण्याचं काम करत आहेत. छत्रपती संभाजीनगरच्या पैठण तालुक्यातल्या बिडकीनमधले १९ तरुण गणपतीपुळ्याच्या समुद्रात आज सकाळी पोहण्यासाठी उतरले होते. त्या पैकी पाच जण वाहून गेले तर १४ जण सुखरूप आहेत.

**<><><><>**

परभणी जिल्ह्यातल्या यशवाडी इथं हनुमान मंदिराचं निर्माणकार्य सुरू असताना सभा मंडपाचा भाग कोसळून ५ जणांचा मृत्यू झाला असून १६ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी ५ जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती जिल्हाधिकारी संजय चव्हाण यांनी दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेतील मृतांना

समाजमाध्यमांतील संदेशाद्वारे श्रद्धांजली अर्पण केली. राज्य सरकारनं मृतांच्या कुटुंबियांना ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

१२वा ‘आंतरराष्ट्रीय योग दिवस’ उद्या साजरा होणार आहे. ‘निरोगी वयोवृद्धीसाठी योग’ अशी यंदाच्या योगदिनाची संकल्पना असून जगभरात सुमारे अडीच हजार ठिकाणी विविध संस्था संघटनांतर्फे योगविषयक कार्यक्रम होणार आहेत. योगदिनाचा मुख्य कार्यक्रम उद्या कोलकात्याच्या ऐतिहासिक रेड रोडवर होणार असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी त्यात सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण सकाळी साडे सहा वाजल्यापासून आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून केलं जाणार आहे. त्यामुळे पुणे तसंच छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून प्रसारित होणारं 'प्रादेशिक बातमीपत्र' या कार्यक्रमाच्या थेट प्रसारणानंतर प्रसारित करण्यात येईल.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या मध्य प्रदेशात जबलपूर इथं आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

राज्याच्या अनेक भागांमध्ये योग् दिन विविध प्रकारे साजरा होत आहे.
सावित्रीबाई फुले **पुणे** विद्यापीठ परिसरातल्या विद्यापीठ हायस्कूलमध्ये आजच ‘आंतरराष्ट्रीय योग दिन’ मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. केंद्रीय संचार ब्यूरो, **अहिल्यानगर** यांच्या वतीनं योग प्रशिक्षण कार्यक्रम आणि चित्रकला स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं.

जागतिक योग दिनानिमित्त **हिंगोली** शहरात जनजागृती रॅली काढण्यात आली. यामध्ये शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्या नीट परीक्षा असल्यानं आजच **धुळे** जिल्ह्यात योग दिवसाचा कार्यक्रम घेण्यात आला.

**<><><><><>**

काँग्रेस नेते पवनराजे निंबाळकर आणि त्यांच्या चालकाच्या खून प्रकरणात राज्याचे माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील आणि ७ इतर आरोपींची मुंबईतल्या विशेष सीबीआय न्यायालयानं आज निर्दोष मुक्तता केली. सरकारी पक्षाची पूर्ण भिस्त माफीचा साक्षीदार झालेला पारसमल जैन याच्या साक्षीवर होती, पण त्याची साक्ष विश्वासार्ह नसल्याचं सांगून न्यायालयानं ही साक्ष फेटाळून लावली. हा संपूर्ण घटनाक्रम आणि त्यातलं कारस्थान स्पष्ट

करण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरल्याचा निर्वाळा विशेष सीबीआय न्यायाधीश सत्यनारायण नावंदर यांनी दिला आणि आरोपींची मुक्तता केली. या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याचं सीबीआयनं सांगितलं.

२००६ मध्ये पवनराजे निंबाळकर आणि त्यांचे चालक समद काझी यांची नवी मुंबईतल्या कळंबोली इथं गोळ्या झाडून हत्या झाली होती. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास नवी मुंबई पोलिसांनी केला, नंतर हे प्रकरण सीबीआयकडे वर्ग करण्यात आलं.

**<><><><><>**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातल्या एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतल्या चेन्नईत एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर सुरु असलेल्या तिसऱ्या आणि अंतिम सामन्यात अफगाणिस्तानने भारतासमोर विजयासाठी २१९ धावांचं आव्हान ठेवलं आहे. सामन्याचं शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १७ व्या षटकांत बिनबाद १२७ धावा झाल्या होत्या.

दरम्यान, याआधीचे दोन्ही सामने जिंकत भारतानं मालिकेत विजयी आघाडी घेतली आहे.

**<><><><><>**

मुंबईत संपात सहभागी झालेल्या ‘बेस्ट’च्या सर्व कर्मचाऱ्यांना तसंच बस पुरवठादार कंत्राटदारांना ‘मेस्मा’ अंतर्गत नोटिसा बजावण्यात आल्याचं ‘बेस्ट’ने प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितलं आहे. गेल्या दोन दिवसांपासून बेस्ट कर्मचाऱ्यांचा संप सुरू आहे, त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी शंभर बसगाड्या उपलब्ध करून देण्याची विनंती महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला केल्याचं ‘बेस्ट’नं सांगितलं आहे.

उद्या होणाऱ्या नीट यूजी परीक्षेसाठी मुंबईतल्या ६३ केंद्रांवर जाण्या येण्यासाठी सकाळी ९ ते दुपारी एक आणि संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत ६० अतिरिक्त बसगाड्यांची व्यवस्था केली गेली आहे, असंही ‘बेस्ट’ने प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितलं. या संपाचा ‘बेस्ट’च्या विद्युत पुरवठा विभागावर कोणताही परिणाम झालेला नाही असंही यात म्हटलं आहे.

दरम्यान, ‘बेस्ट संयुक्त कामगार कृती समिती’नं कर्मचारी चर्चेसाठी तयार असल्याचं म्हटलं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात दक्षिण कोकण आणि राज्याच्या काही भागात मान्सून सक्रिय होण्याची शक्यता असून २४ ते २६ जून पर्यंत मुंबईसह राज्याच्या अंतर्गत भागांपर्यंत पावसाचा जोर वाढेल, असं हवामान विभागाचे निवृत्त अधिकारी कृष्णानंद होसाळीकर यांनी सांगितलं आहे. सध्या राज्यात केवळ ८ ते ९ टक्के पाणीसाठा आहे. एल निनोच्या प्रभावामुळे मान्सून लांबला असून नागरिकांनी पाण्याचं योग्य नियोजन करून अपव्यय टाळावा, असं आवाहन त्यांनी केलं आहे.

//<><><><><>//